Vol 6 Issue 2 August 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 2 | August - 2016

GRT Golden Research Thoughts

# भारतातील अनुसूचित जातीकडे असलेल्या जमिनीचे प्रमाण.

डॉ. सुरेश बी. ढाके.[1] , राजरत्न भिमराव पोहेकर[2]
[1]विभाग प्रमुख अर्थशास्त्र ,कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, जळगांव.महिला महाविद्यालय,डोंगर कठोरे , ता यावल जि जळगांव.
[2]संशोधक विद्यार्थी , उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ .



**प्रस्तावना—**

भारत देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर देशात सक्षम अशी राज्य—घटना तयार करण्यात आली त्यानुसार देशातील विषमता नष्ट करणे व समाजवादी समाजरचना निर्माण करणे हे मुख्य—ध्येय या घटनेस अभिप्रेत होते. सामाजिक व आर्थिक समानता निर्माण करण्यासाठी शासनाने ज्या धोरणांचा अवलंब केला त्या धोरणांमध्ये जमिन विषयाच्या मालकीच्या प्रश्नाला सर्वात जास्त महत्व देण्यात आले. कारण जी व्यक्ती शेतीमध्ये स्वतःहा काबाड—कष्ट करतो त्या व्यक्तीला प्रत्यक्षात त्या शेतीची मालकी प्रदान केल्यास त्यांचा उत्साह वाढून ती व्यक्ती शेतीत जास्त उत्पन्न काढण्यासाठी काळजी घेतो. अर्थातच उत्पन्नात वाढ झाली म्हणजे देशाच्या आर्थिक उत्पन्नात भर पडणार आणि देशाच्या उत्पन्नात भर पडली म्हणजे समाजातील आार्थिक विषमता नष्ट करायला मदत होईल.

भारतासारख्या विकसनशिल देशात गरिब व श्रीमंत यांच्यातील आर्थिक व सामाजिक विषमता दूर करणे हा महत्वाचा प्रश्न आहे. आपल्या देशात जमिनी सारख्या महत्वाच्या साधनाची मालकी एका विशिष्ट वर्गाच्या हाती झालेली आहे. पुर्वी जमिनीच्या हक्का वरून समाजातील प्रतिश्ठा व आर्थिक स्थैर्य अवलंबून होते. ग्रामीण विकास व समृध्दी वाढविण्यासाठी जमिनीवरील मालकी हक्काची तफावत नाहिशी करणे अत्यंत आवश्यक आहे. भारत देश कृशी क्षेत्रावर अवलंबून असणारा प्राचीन देश आहे. जमिन हे महत्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. मागील खुप कालखंडापासून जमिन व्यवस्थापनाला महत्व प्राप्त झाले आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलाधार आहे. संपूर्ण अर्थव्यवस्थेची जी कामगिरी आहे ती आज ही याच क्षेत्राच्या कामगिरीवर अवलंबून आहे. म्हणून जमिनीला महत्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागात जमिनीचे प्रमाण एका विशिष्ट वर्गाकडे असल्यामुळे इतर समाज घटकात म्हणजेच अनुसूचित जाती/जमाती यांच्याकडे जमिनीची वाटणी विषम प्रमाणात झाली आहे.

## अनुसूचित जातीकडे असलेल्या जमिनीचे प्रमाण

तक्ता क्र. 1

| Social groups | Up to 0.40 | | | | Up to 1.00 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1993—94 | 1999—2000 | 2004—05 | 2009—10 | 1993—94 | 1999—2000 | 2004—05 | 2009—10 |
| Other | 49.1 | 52.1 | 52.5 | 58.1 | 68.6 | 71.2 | 71.00 | 75.2 |
| OBC | | 56.5 | 56.0 | 62.7 | | 76.7 | 75.5 | 79.4 |
| SC | 71.7 | 75.0 | 74.9 | 80.0 | 86.6 | 89.7 | 89.6 | 92.1 |
| ST | 73.2 | 46.3 | 46.4 | 56.7 | 64.6 | 70.6 | 70.3 | 76.5 |
| All | 53.3 | 58.1 | 58.2 | 64.8 | 72.0 | 72.2 | 76.9 | 80.8 |

Source: NSS Report Employment and unemployment situation among groups in India (Various Round: 1993-94, 1999-2000, 2004-05 and 2009-10)

वरिल तक्त्या वरून असे दिसून येते की 1993—94 ते 1999—2000,2004—05 व 2009—10 या वर्षामध्ये सामान्य गटाकडे अनुक्रमे 0.40 एकर चे प्रमाण 49, 52.1, 52.5 व 58.1 एवढे (टक्के) होते. तर त्याच वर्षामध्ये एक हेक्टर चे प्रमाण हे अनुक्रमे 68.6, 72.2, 71.00 व 75.1 (टक्के) होते. तर इतर मागासवर्गीय यांचे त्याच वर्षीचे प्रमाण अनुक्रमे 1993—94 सोडुन 0. 40 ते एक हेक्टर चे प्रमाण 56.5, 56.0, 62.7 टक्के एवढे तर 76.7, 75.5, 79.4 टक्के इतके दिसून येते. व अनुसूचित जातीकडे असलेले त्याच वर्षाचे प्रमाण अनुक्रमे 0.40 चे 71.7, 75.0, 74.9, 80.00 टक्के व एक हेक्टर चे 86.6, 89.7, 89.6, 92.1 ( टक्के) एवढे जमिनीचे प्रमाण आहे. अनुसूचित जमातीकडे त्याच वर्षीचे प्रमाण 0.40 ते एक हेक्टर चे प्रमाण अनुक्रमे 73. 2, 46.3, 46.4, 56.7 व 64.6, 70.6 76.9, 76.5 (टक्के ) इतक्या प्रमाणात होते.

वरिल आकडेवारी वरून असे लक्षात येते की इतर समाज घटकांच्या तुलनेत अनुसूचित जातीकडे 0. 40 ते एक हेक्टर चे जमिनीचे प्रमाण अधिक आहे. म्हणजेच त्यांच्याकडे एक हेक्टर पेक्षा जास्तीची जमिन नाही. इतक्या प्रमाणात असलेल्या जमिनीतून निघणारे उत्पादन पुरेसे नाही. म्हणून त्यांना उदरनिर्वाहासाठी इतर समाजघटकांच्या जमिनीवर काम करावे लागते.

## • अनुसूचित जातीला वाटप करण्यात आलेली जमीन.

कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत जमिन म्हणजे केवळ उत्पादनाचे आणि उत्पन्नाचे अतिमहत्वाचे साधन तर असतेच त्याच बरोबर ते सामाजिक व आर्थिक स्थिती संतुलीत करण्याचे कार्य करते. दारिद्र्या आणि भूक यापासून सुरक्षा मिळवुन देणारे एक साधन असते. त्यामुळे अनुसूचित जातीला जमिन किती प्रमाणात वाटप करण्यात आली हे खालील तक्त्यावरून पाहू.

अनुसूचित जातीला वाटप करण्यात आलेली जमीनीचे प्रमाण.

*तक्ता क्र.2.*

| भुमिचे आकारमान | सामान्य | इतर मागासवर्गीय जाती | अनु. जाती. | अनु.जमाती. | एकुण. |
|---|---|---|---|---|---|
| कमी भुमीचे आकारमान( land less 0.002 ) | 7.40 | 6.98 | 7.18 | 9.41 | 7.41 |
| सिमांत( marginal ) | 70.22 | 75.25 | 85.70 | 68.83 | 75.42 |
| लहान ( small ) | 11.31 | 10.43 | 4.77 | 14.64 | 10.00 |
| अल्प–मध्यम( semi –medium 2.00 - 4.00 ) | 7.18 | 5.12 | 1.84 | 5.74 | 5.01 |
| मध्यम( medium 4.00 - 10.00 ) | 3.34 | 1.99 | 0.48 | 1.36 | 1.93 |
| जास्त( large 10.00 above ) | 0.55 | 0.23 | 0.03 | 0.03 | 0.24 |
| एकुण( total ) | 100 | 100 | 100 | 100 | 100 |

Source: NSS round 69th

वरिल आकडेवारीवरून असे दिसून येते की जसे–जसे जमिनीचे वाटपाचे म्हणजे सिमांत लहान, अल्प–मध्यम व जास्त (large) या प्रमाणामध्ये जमिनीचे वाटप होते तस–तसे सर्वच सामाजिक घटकांचे जमिन वाटपातील आकडेवारी बदलतांना दिसून येते. परंतु ही आकडेवार बदलत असतांना अनुसूचित जातीला इतर समाजघटकांच्या तुलनेत जमिन वाटप सर्वच क्षेत्रात कमीच करण्यात आली आहे. म्हणुन त्यांचा विकास होण्यास खुप कालावधी लागेल जर अशी परिस्थिती राहिली तर. त्यासाठी शासनाने त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी समान प्रमाणात जमिनीचे वितरण केले पाहीजे.

## • अनुसूचीत जातीच्या वहीवाटी शेतीचे आकारमान.

एखादी व्यक्ती फक्त स्वत: वा इतरांच्या मदतीने कृषी उत्पादन घेण्याकरिता जे तांत्रिक व आर्थिक दृष्टीने सोयीचे असे जमिनीचे एकक (युनिट) पूर्ण अथवा भागषः वापरले अशा शेतजमिनीस वहिवाट वा भोगवट्याची जमिन (ऑपरेशन होल्डींग) म्हणतात.

राज्यनिहाय अनुसूचित जातीकडे जमिन वहीवाटीचे क्षेत्रफळ व संख्या

*तक्ता क्र.3*

| Sr. No. | State / U/S | इतर सामाजिक गट | | अनु.जामाती | | अनु.जाती | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्रम (Number) | क्षेत्र (Sector) | क्रमNumber | क्षेत्र Sector) | क्रम (Number | क्षेत्र (Sector ) |
| 1 | Andaman&Nicobar | 1.84 | 0.05 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 2 | Andra Pradesh | 9.39 | -1.35 | 14.32 | 2.98 | 2.41 | -3.09 |
| 3 | Arunachal Pradesh | 0.61 | 6.21 | 0.15 | 8.16 | 0.00 | 0.00 |
| 4 | Assam | -1.09 | -1.62 | 0.06 | 5.42 | -16.33 | -9.07 |
| 5 | Bihar | 10.47 | 2.19 | 11.31 | 6.07 | 13.61 | 7.75 |
| 6 | Chandigarh | -36.25 | -24.41 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 7 | Chhattisgarh | 8.26 | -1.68 | 6.46 | -2.36 | 4.05 | -5.15 |
| 8 | Dadar & N. Haveli | 1.83 | -17.78 | 1.32 | -1.60 | 0.43 | -9.42 |
| 9 | Daman & Div | 9.60 | -21.65 | 17.20 | 8.45 | 8.73 | -33.81 |
| 10 | Delhi | -19.02 | -21.56 | 0.00 | 0.00 | 27.19 | 250.06 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | Goa | 47.71 | 46.51 | 78.45 | 20.50 | 30.64 | -25.98 |
| 12 | Gujarat | 4.82 | -3.61 | 3.45 | -0.05 | 1.21 | -5.00 |
| 13 | Haryana | 0.88 | 1.74 | 0.00 | 0.00 | -12.22 | -2.68 |
| 14 | Himachal Pradesh | 2.93 | -1.41 | 25.18 | 17.53 | 1.53 | -1.98 |
| 15 | Jammu&Kashmir | 5.20 | -2.94 | -1.67 | -9.56 | _ | _ |
| 16 | Jharkhand | NA | NA | NA | NA | NA | NA |
| 17 | Karnataka | 3.32 | -1.80 | 7.62 | 2.72 | 3.65 | -2.35 |
| 18 | Kerala | -1.06 | -2.83 | 9.00 | 14.06 | -8.15 | -11.03 |
| 19 | Lakshadweep | 0.42 | -1.03 | 0.46 | -1.22 | 0.00 | 0.00 |
| 20 | Madhya Pradesh | 12.19 | -0.99 | 9.52 | -1.94 | 4.20 | -5.00 |
| 21 | Maharashtra | -0.12 | -1.19 | -1.84 | 1.91 | -3.62 | 5.59 |
| 22 | Manipur | 0.10 | 0.00 | 0.23 | 0.10 | 0.16 | -0.35 |
| 23 | Meghalaya | 3.11 | 19.37 | 3.09 | 20.40 | 0.00 | 0.00 |
| 24 | Mizoram | 2.36 | -4.61 | 2.31 | -2.17 | 0.00 | 0.00 |
| 25 | Nagaland | 5.41 | -8.41 | 5.35 | -8.38 | 0.00 | 0.00 |
| 26 | Odessa | 7.14 | -3.34 | 1.29 | -7.64 | 11.30 | 7.40 |
| 27 | Pondicherry | 5.56 | -10.36 | 0.00 | 0.00 | 34.33 | 9.28 |
| 28 | Punjab | 4.79 | 0.08 | 0.00 | 0.00 | 69.86 | 11.68 |
| 29 | Rajasthan | 11.35 | 0.94 | 15.76 | -1.08 | 10.45 | 2.14 |
| 30 | Sikkim | 2.05 | -1.77 | 20.75 | -0.11 | 9.51 | 22.19 |
| 31 | Tamilnadu | -0.91 | -4.92 | 8.42 | -0.70 | -1.21 | -2.19 |
| 32 | Tripura | 2.31 | 1.61 | 4.93 | 9.95 | 1.61 | 1.85 |
| 33 | Uttar Pradesh | 3.86 | -1.59 | 27.58 | 13.67 | 4.58 | 1.37 |
| 34 | Uttrakhand | -0.97 | -3.70 | -0.17 | -0.70 | 1.02 | 0.06 |
| 35 | West Bangal | 1.88 | -0.29 | 5.17 | 0.22 | 2.14 | 0.45 |
| 36 | India | 7.06 | 0.80 | 16.06 | 7.63 | 6.38 | 3.16 |

Source: Agriculture censes 2011

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की भारतातील राज्यनिहाय जी जमिन वहीवाट करण्यासाठी जे क्रम (Number) – क्षेत्र (Sector) चे प्रमाण आहे. ते प्रमाण प्रत्येक राज्यामध्ये भिन्न दिसून येते. अंदमान व निकोबार या केंद्रशासित प्रदेशाचा विचार केला असता त्यामध्ये इतर सामाजिक गटाकडे क्षेत्रफळाचे प्रमाण हे 0.05 (टक्के) आहे. तर त्याच ठिकाणी अनुसूचित जाती /जमाती कडे कसलीही जमिन ही वहीवाटीसाठी नाही. तर आंध्रप्रदेशामध्ये वहीवाटीचे प्रमाण हे इतर समाज वर्गाकडे क्रम (Number) 9.39 (टक्के) होती तर क्षेत्र (Sector) चे प्रमाण 1.35 (टक्के) व अनुसूचित जमाती यांच्याकडे 14.32 (टक्के) क्रम (Number) व क्षेत्र (Sector) चे प्रमाण 2.98 (टक्के) आहे. व SC कडे यांच्यापेक्षाही कमी म्हणजे 2.41(टक्के) 3.09 टक्के होती. इतर राज्यनिहाय विचार केला असता त्यामध्ये गोवा, दिल्ली, हिमाचलप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा व राजस्थान या राज्यात वहीवाटीचे प्रमाण काही प्रमाणात बरे आहे. तर इतर राज्यामध्ये तेच प्रमाण कमी दिसून येते. ह्याा राज्यांतील अनुसूचित जातीकडे इतर समाज घटकांच्या तुलनेत वहीवाटीची जमिन कमीच आहे. तर काही राज्यांमध्ये त्यांच्याकडे कोणतीही जमिन वहीवाटीसाठी नाही. म्हणुन त्यांना इतरांच्या शेतजमिनीवर मजुरीसाठी जावे लागते. आणि आपला उदरनिर्वाह भागवावा लागतो.

## सारांश :

वरील निष्कर्षा वरून असे लक्षात येते की भारतातील शेतीच्या वितरणा संदर्भात खुप मोठी विषमता आहे. कारण शेती एका विशिष्ट समाज वर्गाकडे जास्त प्रमाणात एकवटली गेलेली आहे. तर दुसरा समुह त्यापासून अजुनही वंचित दिसत आहे. अनुसूचित जातीच्या संदर्भात तर जमिनीचे विषम प्रमाणात वितरण व त्यांना वहिवाटीसाठी असलेली जमिन कमी दिसून येते. अनुसूचित जातीकडे अल्प प्रमाणात असलेल्या जमिनीतून निघणारे उत्पादन अल्पचं आहे. त्याच कारणामुळे त्यांना इतरांच्या जमिनीवर स्वतःहाच्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागते. अनुसूचित जातीकडे कसण्याठी एक एकर पेक्षाही कमी प्रमाणात जमिनीची मालकी आहे. शासनाने जी जमिन वाटप केली आहे त्यामध्ये सुध्दा अनुसूचित जातीला जमिनीचे वाटप हे कमी प्रमाणात आहे असे वरिल आकडेवरीवरुन दिसून येते. म्हणजेच large आणि medium जमिनीच्या संर्दभात तर जमिन ही अतिशय अल्प प्रमाणात वितरण करण्यात आली आहे.

भारतातील अनुसूचित जाती विकासापासून अजुनही बरेच दूर असल्यामूळे त्यांना विकासाच्या प्रवाहात शासनाने आणले पाहीजे. तरच देशात आर्थिक विषमता काही प्रमाणात कमी होईल.

थोडक्यात भारतातील जमिनीचे समतोल प्रमाणात वितरण झाले तरच अनुसूचित जातींना साधनांची उपलब्धता होईल, परिणामी अनुसूचित जातीचे दरडोई उत्पन्न वाढेल, राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होईल, आर्थिक विषमता कमी होवून देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

## संदर्भ:

1. डॉ. सुखदेव थोरात, "दलित निरंतर विषमता आणि दारिद्र्या", सुगावा प्रकाशन, 562 सदाशिव पेठ, चित्रशाळा इमारत,पुणे, द्वितीय आवृत्ती,2012.
2. कांबळे बळीराम, ''महार वतनी इनामी जमिनीचा प्रश्न''सुगावा प्रकाशन, 562 सदाशिव पेठ, चित्रशाळा इमारत,पुणे 14 मे 2005.
3. एफ.सी. मोरे, ''अनुसूचित जातीच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाची समस्या–ती सोडविण्याचे उपाय,'' मुलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, केशवनगर मुंढवा पुणे. प्र.आ. 24 मार्च 2013.
4. Agriculture cencus 2011.
5. NSS report 2011.
6. Dharma Kumar, "Land and caste on south India", Monohar publication, New Delhi, 1992.
7. Scheduled caste commotions report Handbook 2009.
8. Nancharaiah G. (1998).Land and caste, Himalaya publishers, New Delhi,

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org